प्रपत्र - ३

# करारनामा २०१७-१८

(आयुक्त कृषि ,कृषि आयुक्तालय,म.रा,पुणे व सुक्ष्म सिंचन संच उत्पादक यांच्यामध्ये करावयाचा करारनामा)

आज दिनांक रोजी वार या दिवशी

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग, तर्फे

आयुक्त कृषि ,कृषि आयुक्तालय,म.रा,पुणे .

..........लिहून घेणार

यांसी ..................

मे......................................

रजि. ऑफिस.................................

...............................................

...............................................

(नोंदणीकृत कंपनी/भागीदारी संस्था)

तर्फे श्री......................................

पदनाम ..........................................

रा.................................................

..................................................

..................................................

....लिहून देणार

मी/आम्ही खालीलप्रमाणे लिहून घेणार व लिहून देणार कारणे करारनामा लिहून देतो/घेतो की,

**ज्याअर्थी** महाराष्ट्र राज्य शासनाने (यापुढे "राज्य शासन"असा उल्लेख करण्यात आलेला आहे) केंद्र शासन पुरस्कृत **प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (PRIME MINISTER KRUSHI SINCHAI YOJANA) प्रति थेंब अधिक पीक - सुक्ष्म सिंचन** किंवा इतर केंद्र / राज्य पुरस्कृत योजनेच्या माध्यमातून अधिकृत उत्पादकामार्फत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन संच पुरविण्याची योजना अंगिकारली आहे.

**ज्याअर्थी** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना **सन २०१७-१८** अन्वये केंद्र शासनाने / राज्य शासनाने काही मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या असून त्याधर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य ,पुणे यांनी देखील पत्र **दिनांक ----------------** अन्वये व वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत / केल्या जातील.

**ज्याअर्थी** महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे व त्यामधील अटी व शर्तींचे अनुपालन करणा-या व पात्र ठरणा-या अधिकृत उत्पादक यांचेकडून विहीत नमुन्यात अर्ज मागवून, त्या अर्जांची विहीत केलेल्या निकषांनुसार छाननी करून लिहून देणार यांना महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हामध्ये **सन २०१७-१८** मध्ये विविध योजनेअंतर्गत सुक्ष्म सिंचन संच पुरविण्यास लिहून देणार यांनी मान्यता दिलेली आहे.

**ज्याअर्थी** आयुक्त कृषि,कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे (यापुढे लिहून घेणार असा उल्लेख करण्यात आलेला आहे) यांना शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना , अटी व शर्ती तसेच राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या खालील अटी व शर्ती लिहून देणार यांना मान्य आहेत.

**त्याअर्थी** लिहून देणार यांचेवर खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील व त्या अटी व शर्तीचे अनुपालन करण्याची लिहून देणार हे सदर करारनाम्याने हमी देत आहेत.

**अटी व शर्ती**

१. शेतक-यांच्या शेतावर कंपनीमार्फत बसविलेला ठिबक सिंचन संचाच्या घटकामध्ये ३ वर्षाच्या कालावधीत काही उत्पादन दोष आढळून आल्यास तो सुस्थितीत करून देतील.

२. शेतक-यांस सूक्ष्म सिंचन संच बसविण्याचे व त्याच्या वापराबाबतचे प्रशिक्षण देणे, सुक्ष्म सिंचन संच चालविण्याच्या तांत्रिक बाबींची माहिती असलेली मराठी भाषेतील पुस्तिका शेतक-यास संच कार्यन्वित करतानाच देणे, वितरकामार्फत गरजेप्रमाणे शेतक-यांच्या शेतास भेट देऊन संचाचे प्रचलन व्यवस्थित आहे व राहील याबाबत मार्गदर्शन करतील.

३. लिहून देणार यांची कंपनी / भागीदारी संस्था संपूर्ण संचातील ठिबक सिंचन संचाच्या बाबतीत लॅटरल, ईमिटर किंवा ईमिटिंग पाईप आणि तुषार सिंचन संचाच्या बाबतीत एचडीपीई कपल्ड/पीव्हीसी पाईप व नोझल या घटकांची उत्पादक आहे. लिहून देणार यांच्याकडे संचातील उत्पादक बाबींसाठी वैध **बीआयएस प्रमाणपत्र** आहे. संचातील ज्या बाबी लिहून देणार हे उत्पादित करीत नाहीत त्या बाबींसाठी वैध बीआयएस प्रमाणपत्र किंवा ब्रॅन्डनेम वापरण्यास इतर पुरवठादार कंपन्यांनी मान्यता दिल्याची लेखी वैध हमी देतील.

४. कंपनीकडून नेमण्यात आलेल्या अधिकृत वितरकांची यादी जिल्हा, उपविभाग व तालुका स्तरावरील क्षेत्रिय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामध्ये बदल झाल्यास त्यानुसार अद्यावत यादी वरील प्रमाणे सर्व अधिका-यांना १० दिवसांत उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. शासननिर्णय दिनांक ------------------------ मधील तरतुदींनुसार सुक्ष्म सिंचन संचाच्या घटकांच्या गुणवत्तेबाबतची तपासणी करण्यासाठी कंपनीचे प्रतिनिधी तसेच त्यांचे अधिकृत विक्रेते व वितरक तपासणी करणा-या अधिकारी / कर्मचा-यास आवश्यक ते सहकार्य करतील.

६. उत्पादन करण्याच्या प्रत्यक्ष जागेवरुन उत्पादीत सुक्ष्म सिंचन घटक वितरणासाठी पाठविल्याच्या पुरवठा साखळीमधून व शेतक-यांच्या शेतावरुन सुक्ष्म सिंचन संचाच्या तपासणी करावयाच्या घटकांचे नमुने काढण्यास आवश्यक ते सर्व सहकार्य करतील.अशा काढलेल्या नमुन्याबदद्ल कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारणार नाही. तसेच शेतक-याच्या शेतावरुन नमुने काढले गेल्यास तेवढयाच घटकांचा विनामूल्य पुरवठा करतील.तसेच कृषि विभागाच्या अधिका-यांमार्फत उत्पादन स्थळाची तपासणी करण्यासही लिहून देणार यांची सहमती आहे.

विविध घटकांचे नमुने तपासणीसाठी कोणत्या प्रयोगशाळेत पाठवायचे याचा निर्णय घेण्याचा अधिकार कृषि विभागातील अधिका-यांचा राहिल व त्याबाबत लिहून देणार यांची काहीही हरकत असणार नाही याची लिहून देणार हमी देत आहे.

७. लिहून देणार यांच्या कंपनी किंवा भागीदारी संस्थेच्या उत्पादनातील आणि इतर पुरवठादाराकडून घेतलेल्या घटकांचे काढलेले नमुने तपासणीमध्ये बी.आय.एस च्या दर्जानुसार अपात्र / कमी दर्जाचे ठरल्यास अथवा

लाभर्थी शेतकऱ्यास विक्रिपश्चात सेवा देण्यात कसुर केल्यास आणि लाभधारकाने याबाबत तक्रार दिल्यास कंपनीस राज्यस्तरीय मंजूरी समिती(SLSC) अथवा राज्यस्तरीय मंजूरी समितीने (SLSC)प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे त्या तपासणी अहवालावर / लाभार्थीच्या तक्रारीवर म्हणने मांडण्याची संधी देऊन त्यानुसार लिहून देणार यांच्याविरूध्द कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग भारत सरकार यांचे पत्र क्र.११-१४२/२०१५-हॉर्ट,कृषि भवण नवि दिल्ली,दि.०१ एप्रिल,२०१७ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या कार्यात्मक मार्गदर्शक सुचनामधिल परिच्छेद - १६(१६.१ ते १६.५) मध्ये दिलेली कार्यपध्दती अनुसरुन प्रशासकिय / दंडनिय कारवाई राज्यस्तरीय मंजूरी समिती(SLSC) अथवा राज्यस्तरीय मंजूरी समितीने(SLSC)प्राधिकृत केलेले अधिकारी करतील व त्यांचा निर्णय लिहून देणार यांच्यावर बंधनकारक राहील.

८. तालुका कृषि अधिकारी व कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधिने संयुक्त रित्या प्रमाणीत केलेली विहीत नमुन्यातील साठा नोंदवही ठेवणे वितरकास बंधनकारक राहील.

९. लिहून देणार यांच्या कंपनी / भागीदारी संस्थेमार्फत सूक्ष्म सिंचन संचाच्या विविध घटकांच्या विक्रीचा मासिक अहवाल व तसेच इतर काही अहवाल निश्चित करुन दिल्यास कृषि आयुक्तालयास विहित कालमर्यादेत सादर करतील.

१०. सुक्ष्म सिंचन संचाचा आराखडा तांत्रिकदृष्टया योग्य असल्याचे कंपनीच्या तज्ञ प्रतिनिधीमार्फत खात्री करुन तसे प्रमाणपत्र देण्याची लिहून देणार हमी देत आहे.

११. सुक्ष्म सिंचन संच अपुर्ण बसविणे / न बसविता बील सादर करणे, चुकीचे बील देणे, घटकांच्या वैशिष्टयांमध्ये तफावत(variations in component specifications), पंप / संच पध्दतीच्या पाणी उत्सर्जना बाबत चुकिची कागदपत्रे सादर करणे, अयोग्य पध्दतीने संच बसविणे,मान्यता दिलेल्या दरांपेक्षा जास्तीचे दर आकारणे,विहित केलेल्या मुलभूत घटकांच्या वैशिष्टयांमध्ये तफावत ईत्यादी व्दारे शेतक-यांची अथवा शासनाची फसवणुक केल्यास त्याला कंपनीचे अधिकृत विक्रेते आणि लिहून देणार जबाबदार राहतील व याबाबतीत राज्यस्तरीय मंजूरी समिती(SLSC)जो निर्णय घेईल, तसेच, भारतीय दंड संहिता(Indian Penal Code) आणि इतर संबंधित / योग्य वैधानिक कायदयांतर्गत केली जाणारी कारवाई लिहून देणार यांच्यावर बंधनकारक राहील.

१२ ठिबक / तुषार / सुक्ष्म सिंचन संचाच्या प्रमुख घटकांवर कंपनीचे नाव , सीएमएल नंबर , क्लास , कॅटेगरी, रेग्युलेटेड/ अन्रेग्युलेटेड इत्यादी बाबीचा ठळकपणे व सहजपणे वाचता येईल असा सुस्पष्ट उल्लेख करण्यात येईल याची लिहून देणार हे खात्री देतात. असे न केल्यास लिहून देणार यांना संचालक फलोत्पादन/आयुक्त, कृषि,कृषि आयुक्तालय, पुणे यांच्याकडे म्हणने मांडण्याची संधी देवून त्यांनी दिलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल यास लिहून देणार यांची सहमती आहे.

१३. कंपनीने वितरक म्हणून शेतक-यांच्या शेतावर सुक्ष्म सिंचन संच बसविला असेल तर संच घटकांच्या शासनमान्य सुचक साहित्य गरज (Indicative Material Requirement) च्या आधिन राहून कृषि विभागाचे अधिकारी अनुदानाची परीगणना करतील. अनुदानाची रक्कम सरळरित्या संबंधित शेतक-यांच्या बँक खात्यावर / बँक कर्ज खात्यावर जमा करतील त्यास लिहुन देण्या-याची सहमती आहे.

१४. कंपनी स्वतः / वितरक म्हणुन शेतक-यांच्या शेतावर सुक्ष्म सिंचन संच बसवित असेल तर, मार्गदर्शक सूचनेनुसार मान्य असलेल्या घटकांचे / बाबींचे बिल, कंपनीचे देणे बंधनकारक राहील. बिलामध्ये उल्लेख केलेल्या रक्कमेव्यतिरीक्त इतर कारणास्तव कोणतीही रक्कम शेतक-यांकडून कंपनी मार्फत घेण्यात येणार नाही. (कंपनीला यासाठी त्या जिल्ह्यामध्ये वितरक म्हणून नोंदणी करावी लागेल आणि वितरकाचे नियम बंधनकारक राहतील.)

१५. कंपनी वितरक म्हणून शेतक-यांच्या शेतावर सुक्ष्म सिंचन संच बसवित असेल तर, प्रस्तावांवर कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधिकडून बिल/डिलेव्हरी चलन/इनव्हाईस/सुक्ष्म सिंचन संच आराखडा यावर शेतक-याची/त्याच्या प्रतिनीधीची स्वाक्षरी घेण्यात येईल याची लिहून देणार हे हमी देतात. कंपनी स्वतः / त्यांच्या

अधिकृत वितरकामार्फत सुक्ष्म सिंचन संच बसवत असल्यास बील कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीकडून अधिप्रमाणित(Authenticate)करणे लिहून देणार यांच्यावर बंधनकारक राहील.

१६. कंपनी वितरक म्हणून शेतक-यांच्या शेतावर सुक्ष्म सिंचन संच बसवित असेल तर, शासनाच्या विविध विभागांच्या कायद्याच्या अनुषंगाने नियमांतर्गत तरतुदीचे (उदा.मूल्यवर्धित कर (VAT), विक्री कर इत्यादीचे पालन कंपनीमार्फत करण्यात येईल. त्याबाबतच्या सर्व त्रुटींची/परिणामांची जबाबदारी कंपनीची राहील. त्याबाबत शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक भूर्दंड पडणार नाही याची लिहून देणार हमी देत आहे.

१७. कंपनी वितरक म्हणून शेतक-यांच्या शेतावर सुक्ष्म सिंचन संच बसवित असेल तर, शेतक-याने केलेल्या लिखीत तक्रारीचे निराकरण विहित वेळेत न केल्यास तसेच कृषि विभागाच्या संबंधित अधिका-यांनी तपासणीच्यावेळी दिलेल्या लिखीत सूचनांचे पालन न केल्यास आणि निर्देशित केलेल्या त्रुटींची पूर्तता न केल्यास, संचालक फलोत्पादन/आयुक्त, कृषि,कृषि आयुक्तालय, पुणे यांच्याकडे म्हणने मांडण्याची संधी देवून त्यामधील निर्णयानुसार कंपनी विरूध्द योग्य ती प्रशासकिय / दंडनीय कारवाई करण्यात येईल

१८. सदर करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचे लिहून देणार यांनी उल्लंघन केल्यास राज्यस्तरीय मंजूरी समिती (SLSC) अथवा राज्यस्तरीय मंजूरी समितीने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सुनावणी घेतली जाईल. सुनावणीनंतर दंडनीय कारवाई अथवा पारित केलेला निर्णय अंतिम राहील व तो लिहून देणा-यावर बंधनकारक राहील.

१९. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत (PMKSY) केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजनेच्या मार्गदर्शक सुचना सन २०१७ मधील मधील परिच्छेद-१४ ते १७ मधिल अटी व शर्ती लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे.

२०. सदर करारनाम्याबाबत कोणताही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास तो मे. पुणे न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात राहील यास लिहून देणार यांची सहमती आहे.

वरील करारनाम्यातील मजकूर, अटी व शर्ती आम्ही वाचलेल्या असून त्या ख-या व बरोबर आहेत व त्या आम्हास मान्य व कबूल असल्याने आम्ही राजीखुशीने , अक्कलहुशारीने, कोणत्याही दबावास बळी न पडता , कोणतेही नशापान न करता, समजून व उमजून घेवून त्यावर आमच्या सहया पुणे मुक्कामी आज रोजी खालील साक्षीदारांसमक्ष केलेल्या आहेत.

स्थळ : ................

दिनांक : ...................

कंपनी सिल

स्वाक्षरी

नाव

साक्षीदार :

१ . सही-

नाव-

पूर्ण पत्ता -

२ . सही-

नाव-

पूर्ण पत्ता -

स्वाक्षरी नाव

कार्यालयाचा शिक्का

आयुक्त कृषि ,कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य ,

पुणे ४११००५

(लिहून घेणार)